पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १२४**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १९/०६/२०१९** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार **दि.१९/०६/२०१९** रोजी दुपारी **०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव – सभापती**
२. मा.गावडे राजेंद्र तानाजी
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.ममता विनायक गायकवाड
५. मा.करुणा शेखर चिंचवडे
६. मा.लोंढे नम्रता योगेश
७. मा.गीता सुशिल मंचरकर
८. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
९. मा.चोंधे आरती सुरेश
१०. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
११. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
१२. मा.कलाटे मयुर पांडूरंग
१३. मा.कलाटे राहुल तानाजी
१४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

या शिवाय मा.चितळे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्य लेखापरिक्षक, मा.पाटील – प्र.शहर अभियंता, मा.पवार - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे - मुख्य लेखा अधिकारी, मा.निकम - सह शहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.राऊत, मा.दांगट – प्र.सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील - प्राचार्य, औ.प्र.केंद्र, मा.मुंढे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.पोमण - मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.भोसले,

मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.सेठीया, मा.फुटाणे, मा.राणे, मा.वाघुंडे - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी (पी.एम.पी.एम.एल.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२७) प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेकामी विषय मा.महापालिका सभेपुढे नियम १(के) अंतर्गत घेणेबाबत.– मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२८) शहरातील रस्ते साफसफाईचे कामकाज यांत्रिक पध्दतीने करणेकामी निविदा प्रक्रिया राबविणेबाबतचा विषय मा.महापालिका सभेपुढे नियम १(के) अंतर्गत घेणेबाबत.

विषय क्र.२९) मा.स्थायी समिती ठराव क्र.४८६४ दि.१२/०६/२०१६ दुरूस्तीबाबत. - मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३०) आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मानधनावर नेमणूकीबाबत. - मा.राजेंद्र गावडे, मा.राहूल कलाटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३१) कचरा उचलणे व वहातुक करणेचे कामास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३२) मिळकतकर सवलत योजना प्रसिध्दी मोहिम राबविणेबाबत.

विषय क्र.३३) मिळकतकर वसुली बाबत – दि.१३/०७/२०१९ होणा-या राष्ट्रीय लोक अदालतीबाबत विषय मा.महापालिका सभेपुढे नियम १(के) अंतर्गत घेणेबाबत.

विषय क्र.३४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाकडील प्राथमिक शाळेतील विद्यार्थीकरिता मोफत वाहतुक बस सुविधा (३ महिने) उपलब्ध करून देणेबाबत.- मा.नम्रता लोंढे, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३५) वृक्षारोपणासाठी मोठी रोपे खरेदी करणेबाबत.

विषय क्र.३६) मिलिटरी हद्दीतील स्टेशन हेडक्वार्टर देहूरोड येथील तळवडे रूपीनगर येथे मोठी रोपे पुरविणे व लागवड करून २ वर्ष देखभाल करणे.

विषय क्र.३७) महापौर चषक ५९ वी राष्ट्रीय बॉडी बिल्डींग (वरिष्ठ) स्पर्धा २०१९-२० आयोजित करणेस व त्याकीमी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.- मा.राजेंद्र गावडे, मा.झामाबाई बारणे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३८) पिंपरी चिंचवड शहरात पर्यावरण जागृती विषयक बोर्ड बसविणे या कामाचे वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत.

----------

अ) दिनांक ०६/०६/२०१९ व १२/०६/२०१९ (दुपारी २.१२वा.रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१२२) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापची यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १२/०६/२०१९ रोजी (दुपारी २.३०वा.)झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १२३) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापची यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक - ४८६९ विषय क्रमांक – १

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – स्थापत्य अ क्षेत्रीय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.अक्षेका/स्था/कावि/४१/२०१९ दि.२८/०५/२०१९

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्मार्ट सिटीसाठी कार्यालय विकसित करणेकामी आर्किटेक नेमणूक व फी अदा करणेबाबत.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८७० विषय क्रमांक – २

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – अग्निशामक

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचे कडील पत्र क्र.अग्नी/०३/कावि/११६/२०१९ दि.१२/०४/२०१९

विषय - अग्निशामक विभागगाचे कामकाजाकरिता छोटे वाहन खरेदी करणेबाबत.

विषय क्र.२ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८७१ विषय क्रमांक – ३

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.आमुका/०९/कावि/१८४/२०१९ दि.१०/०६/१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मनपा मालकीच्या इमारती मधील कार्यालये, दवाखाने, मनपा शाळा, उद्याने व इतर ठिकाणी असणा-या जमिनीवरील व छतावरील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची शास्त्रोक्त पध्दतीने साफसफाई व स्वच्छता करणे याकामाची २ वर्ष कालावधीसाठी निविदा नोटिस क्र.९-१ ते ९-६/२०१६-२०१७ दोन वर्ष कालावधीसाठी प्रसिध्द केली होती. सदर निविदेची मुळ मुदत दि.३१/१२/२०१८ रोजी संपुष्टात आलेली आहे. तसेच नविन निविदेचे कामकाज प्रस्तावित केले असून त्यास काही कालावधी लागणार असल्याने मे.साइझ टँक क्लिन सर्व्हीसेस प्रा.लि. या संस्थेकडून दि.१/६/२०१९ ते दि.३१/८/२०१९ अखेर (३ महिने)

अथवा नविन निविदा कार्यवाही पूर्ण होईपर्यंत यापैकी प्रथम होईल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व त्याकरीता येणा-या र.रू.१२,८७,०६०/- अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामासाठी र.रू.१२,८७,०६०/-(अक्षरी र.रू.बारा लाख सत्याऐंशी हजार साठ फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८७२ विषय क्रमांक – ४

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.माध्य/शि/३/कावि/१५९/२०१९ दि.१०/०६/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयसाठी सन २०१९-२० च्या शैक्षणिक वर्षात इ.५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना मोफत बसपास योजनेपोटी येणा-या अंदाजे र.रू.३,२०,००,०००/- (अक्षरी र.रू.तीन कोटी वीस लाख) किंवा प्रत्यक्ष खर्चास व पी.एम.पी.एम.एल च्या मागणीनुसार अंदाजे आगाऊ २ कोटी रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८७३ विषय क्रमांक – ५

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२०८/२०१९ दि.११/०६/२०१९

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.84/8/2018-19 अन्वये प्रभाग क्र.२ बो-हाडेवाडी बनकरवस्ती बारणेवस्ती मध्ये ठिकठिकाणी रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.आर.एम.एन्टरप्रायझेस नि.र.रू.29,41,815/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख एक्केचाळीस हजार आठशे पंधरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.26,08,856/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.26,08,856/- पेक्षा 27.60% कमी म्हणजेच र.रु.18,88,812/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.43,984/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.2,88,975/- = एकुण र.रु.22,21,771/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली

वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८७४ विषय क्रमांक – ६

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – वैद्यकिय मुख्य कार्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.वैद्यकिय संचालक यांचे कडील पत्र क्र.वैद्य/९/कावि/१८३२/२०१९ दि.१०/०६/२०१९

मा.वैद्यकिय संचालक यांनी शिफारस केले प्रमाणे –

शासन आदेशानुसार राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम १० मार्च २०१९ रोजी राबविण्यात आली. सदर मोहिमेचा प्रचार व प्रसिध्दी करणेकामी वैद्यकिय विभागाकडील 'एन.यु.एच.एम.'या लेखाशिर्षामधुन वैद्यकिय संचालक पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे र.रु.२,१९,०००/-(अक्षरी र.रू.दोन लाख एकोणीस हजार फक्त) अगाऊ काढुन खर्च करणेत आलेले आहेत त्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८७५ विषय क्रमांक – ७

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – ब क्षेत्रीय आरोग्य

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे कडील पत्र क्र.कावि/५/बक्षेआ/१६८/२०१९ दि.१०/०६/२०१९

मा.क्षेत्रीय अधिकारी यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगपालिका ब क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत औष्णीक धुरीकरण बाबत निविदा नोटीस क्र.2/2017-18 अन्वये प्रसिध्द करुन दर मागविणेत आलेले आहे. मे.मनिष असोसिएटस यांचे कमी दर प्रति टॅम्पो भाडे प्रति दिन र.रु.750/- स्विकृत करणेत आलेला आहे. स्थायी समिती ठराव क्र.2615 दि.02/05/2018 नुसार संस्थेनी कामाचा सिलबंद करारनामा सादर केल्यानुसार दि.19/04/2018 ते दि.18/04/2019 पर्यतचा आदेश क्र.बक्षेआ/5/कावि/287/18 दि.18/04/2018 अन्वये कामाचा आदेश देण्यात आलेला आहे. मे.मनिष असोसिएटस यांचेकडुन औष्णीक धुरीकरणासाठी रिक्षा टेम्पो भाड्याने घेणेसाठीचे कामाची मुदत दि.18/04/2019 रोजी संपलेने दि.19/04/2019 ते दि.31/08/2019 पर्यंत अथवा नवीन निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यत मुदतवाढ देणेसाठी र.रु.1,98,000/- (अक्षरी र.रू.एक लाख अठ्ठयाण्णव हजार फक्त) अपेक्षीत खर्चास व मुदत वाढीस मान्यता देणेची मा.क्षेत्रीय अधिकारी यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामास दि.३१/०८/२०१९ पर्यंत मुदवाढ देणेस तसेच र.रू.१,९८,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख अठ्याण्णव हजार फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत

येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८७६ विषय क्रमांक – ८

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२३०/२०१९ दि.११/०६/२०१९

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.81/1/2018-19 अन्वये प्रभाग क्र.१९ उद्योगनगर व प्रमुख रस्त्यांवर कलर पेव्हींग ब्लॉक, स्टॅम कॉक्रिट अद्ययावत पध्दतीने करणेकामी मे.पी अँन्ड बी कंन्स्ट्रशन नि.र.रू.33,25,078/- (अक्षरी र.रु.तेहतीस लाख पंचवीस हजार अठ्याह-तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.32,75,426/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.32,75,426/- पेक्षा 29.99% कमी म्हणजेच र.रु.22,93,126/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.33,601/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.16,050/- = एकुण र.रु.23,42,777/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८७७ विषय क्रमांक – ९

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – नगररचना व विकास

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.नरवि/कावि/१३/३२/२०१९ दि.०४/०५/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगरभूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांनी मौजे भोसरी व मौजे चिंचवड, ता. हवेली येथिल नदी लगत स.नं./सि.स.नं. च्या क्षेत्राची मोजणी कामी साधी मोजणी फि र.रु.३५,१७,०००/-, तातडी मोजणी फि र.रु.७०,३४,०००/-, अति तातडी मोजणी फि र.रु.१,०५,५१,०००/- होत आहे असे कळविलेले आहे. त्यास अनुसरुन नगरभूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांनी मौजे भोसरी व मौजे चिंचवड, ता. हवेली येथिल नदी लगत स.नं./ सि.स.नं. च्या क्षेत्राची मोजणी कामी साधी मोजणी फि र.रु.३५,१७,०००/- नगरभूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयाकडे जमा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत

आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८७८ विषय क्रमांक – १०

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – प्रशासन

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.प्रशा/०७/कावि/५१/२०१९ दि.२९/०१/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.विधी समिती सभा ठराव क्र.८४ दि.०१/०२/२०१९ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील गणवेश देय कर्मचा-यांना गणवेश व तदनुषंगिक साहित्य गणवेश विनियमातील तरतुदीनुसार देण्यात येते. विनिमयामध्ये नमूद बाबी व्यतिरिक्त कर्मचा-यांचा व इतर बाबींचा समावेश करावयाचा असल्यास मा.विधी समिती सभेमार्फत मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. मुळ नियम हे सन १९९५ साली तयार करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये सन २००४ व सन २०११ मध्ये दुरुस्ती करणेत आलेली आहे. आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील दिनांक २९/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामध्ये सफाई संवर्गातील कर्मचा-यांना थंडीपासून बचाव करणेकामी उबदार कपडे स्वेटर मिळणेकामी होत असलेली मागणी पाहता थंडीपासून बचावासाठी स्वेटर उपलब्ध करुन देणे ही बाब धोरणात्मक आहे. त्या अनुषंगाने आरोग्य विभागाकडून सफाई कर्मचा-यांना थंडीपासून बचावासाठी स्वेटर उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास स्वेटर देय महिला व पुरुष कर्मचारी किती आहेत ? स्वेटर देणेबाबत कोणती निकषे (किती कालावधी नंतर देणे) ठरविण्यात आलेली आहेत.? तसेच स्वेटर कोणत्या प्रकारचे असावे दर्जा, रंग इ. बाबत सविस्तर माहिती मागविण्यात आली होती. त्याबाबत आरोग्य विभागाने दिनांक ०३/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सफाई कर्मचा-यांना २ वर्षातुन एकदा स्वेटर देणेत यावा. स्वेटरचा दर्जा उत्तम प्रतिचे वूलन असावे तसेच मनपाचे अन्य विभागातील कर्मचा-यांना देण्यात येत असलेल्याच रंगाचे स्वेटर देण्यात यावेत असे कळविले आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४६५(१)(ब) अन्वये सद्यस्थितीत वापरात असलेल्या गणवेश विनियमामध्ये आरोग्य विभागातील सफाई संवर्गातील कर्मचा-यांना थंडीपासून बचाव करणेकामी गणवेश देय पुरुष व महिला कर्मचा-यांना ०२ वर्षातुन ०१ वेळेस हिवाळी प्रावरणे १) स्वेटर (संबधित कर्मचा-यांना ठरवून दिलेल्या गणवेशातील रंगाचा) २) मफलर (स्कार्फ) देय राहतील. अशी दुरुस्ती करण्यात यावी. तसेच सदरचे विनियम सन २०११ मध्ये अद्ययावत करण्यात आले होते. सदर विनियमातील गणवेश देय काही पदनाम आता मनपा आस्थापनेवर नाहीत व इतर पदनामामध्ये विलीन/ बदल करण्यात आली आहेत. सदरची पदनामे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पदनाम | शेरा |
|---|---|---|
| १ | कॅटल स्कॉड कुली | सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवर या अभिमानाचे पद नाही. |
| २ | स्थापत्य सहाय्यक | ---//--- |
| ३ | वसुली अधिकारी | ---//--- |
| ४ | भूकरमापक | ---//--- |
| ५ | प्लंबर फिटर | ---//--- |
| ६ | पंप ऑपरेटर | ---//--- |
| ७ | नळ मुकादम | ---//--- |
| ८ | गवंडी | ---//--- |
| ९ | स्टेशन डयुटी ऑफीसर | ---//--- |
| १० | जकात निरिक्षक | जकात विभाग बंद झाल्याने आवश्यकता नाही. |
| ११ | जकात निरिक्षक(महिला) | जकात विभाग बंद झाल्याने आवश्यकता नाही. |
| १२ | नाका शिपाई | जकात विभाग बंद झाल्याने आवश्यकता नाही. |
| १३ | अग्निशामक अधिकारी | पदनामात बदल उपमुख्य अग्निशामक अधिकारी |
| १४ | तांडेल | पदनामात बदल लिडींग फायरमन |

उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आलेली पदनामे विनियम सन २०११ मधून कमी करणेस तसेच सफाई संवर्गातील कर्मचा-यांना थंडीपासून बचाव करणेकामी गणवेश देय पुरुष व महिला कर्मचा-यांना ०२ वर्षातून ०१ वेळेस हिवाळी प्रावरणे १) स्वेटर (संबधित कर्मचा-यांना ठरवून दिलेल्या गणवेशातील रंगाचा) २) मफलर (स्कार्फ) देय राहतील. अशी विनियमात दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८७९ विषय क्रमांक – ११
दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – भूमि आणि जिंदगी
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.भूजि/०६/कावि/१८५/२०१९ दि.०६/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिक, पर्यटक यांचेसाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या कार्याचा, विचारांचा प्रचार व प्रसार करणेकामी शहरामध्ये स्मारक असणे आवश्यक आहे. त्यासाठी आदित्य बिर्ला ग्रुपचे डायरेक्टर श्रीम.राजश्री बिर्ला यांनी महानगरपालिकेच्या ताब्यातील (किमान ०२ एकर जागा) पिंपरी येथील स.नं.२६/१,/२, २७/१अ/,२८/१अ,/१ब,/२,३०/१,/२ पै. सि.स.नं.४६९४ पै.मधील मंजूर बांधकाम रेखांकनातील सुविधा भुखंड व आरक्षण क्र.१२४ (MSEB SUB STATION ) करीता आरक्षित असलेले क्षेत्र ६८०६.५८ चौ.मी. उपलब्ध करून दिल्या नंतर आदित्य बिर्ला ग्रुपच्या वतीने संपूर्ण बांधकाम खर्च

व देखभाल दुरुस्ती केली जाईल. जागेचा व स्मारकाचा ताबा मनपाकडे राहील. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९(क) नुसार मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८८० विषय क्रमांक – १२

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – फ क्षेत्रीय, पाणीपुरवठा

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.फक्षेका/पापु/६/कावि/६३७/१९ दि.१२/०६/१९

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

अमृत योजनेअंतर्गत Implementation of pressurized Water Supply, Reduction of Non-Revenue Water (NRW) and improving Coverage in Akurdi, Chikhali, Jadhavwadi, Rupinagar etc., of Pimpri- Chinchwad city under AMRUT mission. या कामाअंतर्गत प्रभाग क्र.१ व २ सह सर्व प्रभागांमधील विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन टाकणेचे काम चालू आहे. सदर पिण्याचे पाईपलाईन टाकणेच्या कामामध्ये गॅस पाईपलाईनचा एकूण २० ठिकाणी सदर गॅस पाईपलाईन क्रॉसिंग करण्यासाठी अडथळा येत आहे. सदर बाबत दि.७/१२/२०१८ रोजी गेल इंडिया लि. (Gas line) यांचे प्रतिनिधी समवेत बैठक झाली तसेच सदर प्रतिनिधी समवेत जागा पाहणी करून, त्यानुसार नकाशे तयार करून, सदर प्रस्तावित कामाचे नकाशे गेल इंडिया लि. (Gas line) कडील अधिका-यांकडून संमत करून घेण्यात आलेले आहेत. पिण्याच्या पाईपलाईन व गॅस पाईपलाईन यांच्या crossing च्या ठिकाणी काम करणेसाठी गेल इंडिया लि. (Gas line) यांच्या कार्यालयाकडील नाहरकत प्रमाणपत्र घेणेकामी खालील प्रमाणे शुल्क आकारणी आहे.

| कंपनी | एकूण क्रॉसिंग | बाब | दर रु. | GST १८% रु. | एकूण रक्कम रु. २*(४+६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| गेल इंडिया लि. | २० | सुपरव्हिजन चार्जेस | १,००,००० प्रती क्रॉसिंग | १८००० प्रती क्रॉसिंग | २३,६०,००० |
| | २० | प्रोसेसिंग फी | १०,००० प्रती क्रॉसिंग | १८०० प्रती क्रॉसिंग | २,३६,००० |
| | | | | | २५,९६,००० |
| युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि.(गॅस पाईपलाईनसाठी) | २० | इन्शुरन्स (विमा रक्कम ५ कोटी) | एकत्रित | | १,१६,९६४ |

उपरोक्त प्रमाणे १) गेल इंडिया लि. यांना सुपरव्हिजन चार्जेस व प्रोसेसिंग फी कामी एकूण र.रु.२५,९६,००० शुल्क धनाकर्ष (DD) द्वारे अदा करणे आवश्यक आहे.

२) Special Contingency Liability Policy Cover साठी मे. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.लि. यांना र.रु.१,१६,९६४ धनादेश (Cheque) द्वारे अदा करणे आवश्यक आहे.

तरी अमृत योजनेअंतर्गतच्या पिण्याच्या पाईपलाईनसाठी गॅस पाईप लाईन क्रॉसिंगसाठी करणे आवश्यक आहे. तरी वरीलप्रमाणे खर्च अमृत पाणी योजना या लेखाशिर्षावरील र.रु.३०,००,००,०००/- या तरतुदीमधून (पान क्र.५१० अनु क्र.३, सन १९-२०) मधून खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८८१ विषय क्रमांक – १३

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – फ क्षेत्रीय, पाणीपुरवठा

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.फक्षेका/पापु/६/कावि/६३८/१९ दि.१२/०६/१९

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

अमृत योजनेअंतर्गत Implementation of pressurized Water Supply, Reduction of Non-Revenue Water (NRW) and improving Coverage in Akurdi,Chikhali, Jadhavwadi, Rupinagar etc., of Pimpri- Chinchwad city under AMRUT mission. या कामाअंतर्गत प्रभाग क्र.१ व २ सह सर्व प्रबागांमधील विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन टाकणेचे काम चालू आहे. सदर पिण्याचे पाईपलाईन टाकणेच्या कामामध्ये, पेट्रोल पाईपलाईनचा एकूण २० ठिकाणी सदर पेट्रोल पाईपलाईन क्रॉसिंग करण्यासाठी अडथळा येत आहे. सदरबाबत दि.७/१२/२०१८ रोजी हिंदुस्तान पेट्रोलियम कॉ. लि. यांचे प्रतिनिधी समवेत बैठक झाली तसेच सदर प्रतिनिधी समवेत जागा पाहणी करून, त्यानुसार नकाशे तयार करून, सदर प्रस्तावित कामाचे नकाशे हिंदुस्तान पेट्रोलियम कॉ. लि. कडील अधिका-यांकडून संमत करून घेण्यात आलेले आहेत. पिण्याच्या पाईपलाईन व पेट्रोल पाईपलाईन यांच्या crossing च्या ठिकाणी काम करणेसाठी हिंदुस्तान पेट्रोलियम कं. लि.यांच्या कार्यालयाकडील नाहरकत प्रमाणपत्र घेणेकामी खालीलप्रमाणे शुल्क आकारणी आहे.

| कंपनी | एकूण क्रॉसिंग | बाब | दर रु. | GST १८% रु. | एकूण रक्कम रु. २*(४+६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| हिंदुस्तान पेट्रोलियम कॉ. लि. | ६ लोणी कार्यक्षेत्र | सुपरव्हिजन | १८,००० प्रती क्रॉसिंग प्रती दिन | ३,२४० प्रती क्रॉसिंग प्रती दिन | १,२७,४४०/- |
| | १४ तळेगाव कार्यक्षेत्र | सुपरव्हिजन | १८,००० प्रती क्रॉसिंग प्रती दिन | ३,२४० प्रती क्रॉसिंग प्रती दिन | २,९७,३६०/- |
| युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि.(पेट्रोल पाईपलाईनसाठी) | २० | इन्शुरन्स (विमा रक्कम २.५ कोटी) | एकत्रित | | ६७,८२८/- |

उपरोक्त प्रमाणे १) हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई यांना लोणी कार्यक्षेत्रासाठी सुपरव्हिजन कामी एकूण र रु. १,२७,४४० शुल्क धनाकर्ष (DD) द्वारे अदा करणे आवश्यक आहे. २) हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड मुंबई यांना तळेगाव कार्यक्षेत्रासाठी सुपरव्हिजन कामी एकूण र.रु.२,९७,३६० शुल्क धनाकर्ष (DD) द्वारे अदा करणे आवश्यक आहे. ३) Special Contingency Liability Policy Cover साठी मे.युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.लि. यांना र.रु.६७,८२८/- धनादेश (Cheque) द्वारे अदा करणे आवश्यक आहे. तरी अमृत योजनेअंतर्गतच्या पिण्याच्या पाईपलाईनसाठी पेट्रोल क्रॉसिंगसाठी करणे आवश्यक आहे. तरी वरीलप्रमाणे खर्च अमृत पाणी योजना या लेखाशिर्षावरील र.रु.३०,००,००,०००/- या तरतुदीमधून (पान क्र.५१० अनु क्र.३ सन १९-२०) मधून खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८८२ विषय क्रमांक – १४
दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/३३७/१९ दि.११/०६/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात २९ वरिष्ठ निवासी व ६३ कनिष्ठ निवासी पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी जाहिरात क्र.१५२ प्रसिध्द करून पात्र उमेदवारामधुन निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्त आदेश निर्गत केलेले आहेत. परंतु सदर रिक्त राहिलेल्या पदांकरीता Walk In Interview मुलाखतीद्वारे प्रस्तावात नमूद प्रमाणे निवड झालेल्या ३ वरिष्ठ निवासी व १४ कनिष्ठ निवासी डॉक्टरांचे नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८८३ विषय क्रमांक – १५
दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच
सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/३३६/१९ दि.११/०६/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता तात्पुरत्या/हंगामी स्वरूपात नेमणुक केलेल्या श्रीम.लक्ष्मी मेघशाम गणवीर ए.एन.एम यांचे मानधनातील तफावत दुर करणेबाबत

प्रस्ताव सादर केला असता त्यास दि.०८/०३/२०१९ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार त्यांना प्रस्तावात नमूद प्रमाणे मानधनातील तफावत दुर करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८८४ विषय क्रमांक – १६

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – वैद्यकिय मुख्य कार्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.वैद्यकिय संचालक यांचे कडील पत्र क्र.वैद्य/९/कावि/१८५५/२०१९ दि.१२/०६/२०१९

मा.वैद्यकिय संचालक यांनी शिफारस केले प्रमाणे –

शासन आदेशानुसार गोवर रुबेला लसीकरण मोहिम माहे नोव्हेंबर २०१८ रोजी राबविण्यात आली. सदर मोहिमेचा प्रचार व प्रसिध्दी करणेकामी वैद्यकिय विभागाकडील 'शासकिय योजनांची अंमलबजावणी' या लेखाशिर्षामधुन वैद्यकिय संचालक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे र.रु.१,३६,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख छत्तीस हजार फक्त) अगाऊ काढुन खर्च करणेत आलेले आहेत त्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८८५ विषय क्रमांक – १७

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – स्थापत्य उद्यान

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/उ/कावि/३३५/२०१९ दि.१३/०६/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्र.२६ वाकड पिंपळे निलख रोड लगतची जागा येथे लिनिअर गार्डन विकसीत करणेकामी आराखडे तयार करून मंजूरी घेणे, बांधकाम परवानगी घेणे, अंदाजपत्रक तयार करणे इ.निविदा पूर्व कामे व निविदा पश्चात कराव्या लागणा-या कामासाठी स्थापत्य उद्यान विभागामार्फत वास्तुविशारद यांची दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यानुसार मे.शिल्पी आर्किटेक्ट अँन्ड प्लॅनर्स यांचा सदर कामासाठी स्थापत्य १.९१%, हॉर्टीकल्चर ०.९३% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. सदर कामाचे आराखडे व अंदाजपत्रक बनविणे इ.कामे मे.शिल्पी आर्किटेक्ट अँन्ड प्लॅनर्स यांनी मान्य केलेल्या दरानुसार सदर कामासाठी स्थापत्य १.९१%, हॉर्टीकल्चर ०.९३% दराने काम करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८८६ विषय क्रमांक – १८
दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे कडील पत्र क्र.विमुका/८/कावि/३८७/२०१९ दि.१३/०६/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.41/03/2018-19 अन्वये थेरगाव डांगे चौक येथे बांधणेत येणा-या अंडर पासमधील मरावि कंपनीच्या उच्च/लघुदाब विज वाहीन्या हलविणेबाबत (Utility Shifting) मे.ओंकार इलेक्ट्रिकल्स नि.र.रू.88,94,022/- (अक्षरी र.रू.अठ्ठयाऐंशी लाख चौ-यान्नव हजार बावीस फक्त) पेक्षा 14.01% कमी या ठेकेदाराकडून काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८८७ विषय क्रमांक – १९
दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे कडील पत्र क्र.विमुका/८/कावि/३८८/२०१९ दि.१३/०६/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.41/01/2018-19 अन्वये प्र.क्र.48 (नवीन प्र.क्र.27) येथील रहाटणी फाटा ते शिवाजी चौकापर्यंतच्या 18.00 मीटर रुंद रस्त्याचे क्रॉक्रीटीकरण करणेकामी (कामातंर्गत रस्त्याचे विदयुतीकरण करणे) मे.एम.बी. इलेक्ट्रिकल & कं. नि.र.रू.1,99,99,999/- (अक्षरी र.रू.एक कोटी नव्याण्णव लाख नव्याण्णव हजार नऊशे नव्याण्णव फक्त) पेक्षा 18.00% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८८८ विषय क्रमांक – २०
दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – स्थापत्य ह मुख्यालय
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२१२/२०१९ दि.१३/०६/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.80/1/2018-19 अन्वये प्रभाग क्र.३० मध्ये

विविध सेवा वाहिन्यांसाठी होणा-या खोदाईच्या ठिकाणी डांबरीकरण करणेकामी मे.श्रीगणेश कन्स्ट्रक्शन नि.र.रू.74,95,185/- (अक्षरी र.रु.चौ-याहत्तर लाख पंच्यान्नव हजार एकशे पंच्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.73,70,684/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.73,70,684/- पेक्षा 23.07% कमी म्हणजेच र.रु.56,70,267/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.86,500/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.38,000/- = एकुण र.रु.57,94,767/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८८९ विषय क्रमांक – २१

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – स्थापत्य BRTS

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/BRTS/५३६/२०१९ दि.१५/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील पायाभुत सुविधा विकसित करण्याचा वेग पहाता रस्त्यावर पादचा-यांचा वापर अधिक असल्याने अशा ठिकाणी विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, महिला अपघाताला सामोरे जाऊ शकतात. याबाबीचा विचार करता सदरचे रस्ते पादचा-यांची सुरक्षितता विचारात घेऊन 'अर्बन स्ट्रिट डिझाईन' नुसार विकसित केल्यास अपघाताची संख्या निश्चितच कमी होणार आहे. तसेच पादचा-यांची सुरक्षितते मध्ये वाढ होणार आहे. यासाठी अर्बन स्ट्रिट डिझाईन मधील तज्ञ श्री.प्रसन्न देसाई यांचे या कामी मार्गदर्शन मिळणार आहे. सदर रस्त्यांचे सादरीकरण दि.१२/०३/२०१८ रोजी मा.आयुक्त दालना मध्ये मनपाचे सर्व पदाधिकारी म्हणजेच मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.स्थायी समिती सभापती, मा.सभागृह नेता तसेच सर्व गटनेते यांचे समोर करण्यात आलेले आहे. उक्त नमुद पदाधिका-यांनी सदर रस्ते अर्बन स्ट्रिट डिझाईन नुसार विकसित करणेस मान्यता दिलेली आहे. विषयांकित कामासाठी श्री.प्रसन्न देसाई हे अर्बन प्लानर व डिझाईन सल्लागार म्हणुन काम पाहतील तसेच स्थापत्य विषयक कामासाठी मे.पेव्हेटेक कन्सल्टंट पुणे-०५ यांची नेमणुक करण्यात यावी, असे इकडील मत आहे..स्थायी समिती ठराव क्र.२१३९, दि.०७/०२/२०१८ नुसार मे.पेव्हेटेक कन्सल्टंट पुणे-०५ यांना मनपाचे पॅनेलवर मान्यता मिळालेली आहे. मा.स्थायी समिती सभेने सल्लागारांसाठी मान्यता दिलेल्या 'फी' चा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. | Category | Pre tender Fees | Post Tender Fees | Total Fees |
|---|---|---|---|---|
| 1 | Upto 5 crore | 0.75% | 1.25% | 2.00% |
| 2 | 5 to 20 crore | 0.75% | 1.00% | 1.75% |
| 3 | 20 to 50 crore | 0.50% | 1.00% | 1.50% |
| 4 | Above 50 crore | 0.25% | 1.00% | 1.25% |

स्थापत्य विषयक सल्लागार म्हणुन मे.पेव्हेटेक कन्सल्टंट पुणे-०५ यांची निविदा पुर्व (०.५०%) व निविदा पश्चात (१.००%) कामासाठी स्थायी समिती सभेने मान्यता दिलेल्या स्विकृत निविदा रक्कमेच्या १.५०% फी नुसार नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८९० विषय क्रमांक – २२

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२१४/२०१९ दि.१५/०६/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.80/2/2018-19 अन्वये प्रभाग क्र.9 मध्ये ठिकठिकाणी रस्ते अद्ययावत पध्दतीने करणेकामी मे.श्रीगणेश कन्स्ट्रक्शन नि.र.रू.86,66,833/- (अक्षरी र.रु.शहाऐंशी लाख सहासष्ठ हजार आठशे तेहतीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.83,70,902/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.83,70,902/- पेक्षा 23.07% कमी म्हणजेच र.रु.64,39,735/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,32,381/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,63,550/- = एकुण र.रु.67,35,666/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८९१ विषय क्रमांक – २३

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ–मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे कडील पत्र क्र.YCMH/भांडार/२/कावि/८४/१९ दि.१५/०६/१९

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ENT विभागाने

त्यांच्या विभागासाठी ABR/ BERA ची मागणी केलेनुसार सदर उपकरण खरेदी करणेसाठी ई-निविदा सुचना क्र.१0/२०१८-१९ (YCMH) अन्वये निविदा प्रसिध्द करुन मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त निविदांमध्ये मे.प्राईम सर्जिकल & फार्मा, चिंचवड यांनी सादर केलेली निविदा एकूण र.रु.१०,६१,५२२/- हि लघुत्तम प्राप्त झाली असुन संबंधित दर स्विकृत करण्यात आलेले असुन संबंधित पुरवठाधारक मे.प्राईम सर्जिकल & फार्मा, चिंचवड यांना करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने सदर उपकरण खरेदीसाठी होणारा खर्च एकूण र.रु.१०,६१,५२२/- (अक्षरी र.रू.दहा लाख एकसष्ठ हजार पाचशे बावीस फक्त) व तीन वर्षाकरीता AMC साठी र.रु.९८,५३८/- (अक्षरी र.रू.आठ्याण्णव हजार पाचशे अडतीस फक्त) चे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८९२ विषय क्रमांक – २४
दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – अतिक्रमण मुख्य कार्यालय
सूचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.अति/मुख्य/१/कावि/५२/१९ दि.१४/०६/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण निर्मूलन विभागासाठी वरिष्ठ प्रशासकिय अधिकारी होमगार्ड महाराष्ट्र राज्य यांचेकडील संदेश क्रं.मस/कार्यसन-३/बंदो२४ /२०१९/१४७८, दि.३१/०५/२०१९ अन्वये २१ पुरूष व ०९ महिला होमगार्ड यांना दि.०१/०६/२०१९ ते दि.१९/०५/२०२० या कालावधीत कर्तव्यावर तैनात करण्यास मान्यता देणेत आली असून प्रस्तावात नमूद प्रमाणे होमगार्डचे एकूण मानधन र.रू.६०,३०,०००/- (अक्षरी र.रू.साठ लाख तीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८९३ विषय क्रमांक – २५
दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२१५/२०१९ दि.१५/०६/२०१९

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.84/1/2018-19 अन्वये प्रभाग क्र.२ इंद्रायणी पार्क गणेशनगर तुपेवस्ती येथे रस्त्याच्याकडेने पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.वैदेही कन्स्ट्रक्शन नि.र.रू.30,40,459/- (अक्षरी र.रु.तीस लाख चाळीस हजार चारशे एकोणसाठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,37,189/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत.

त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,37,189/- पेक्षा 25.20% कमी म्हणजेच र.रु.21,97,017/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.34,770/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.68,500/- = एकुण र.रु.23,00,287/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८९४ | विषय क्रमांक – २६

दिनांक – १९/०६/२०१९ | विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर | अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ–मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२२१/२०१९ दि.०७/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.90/7/2018-19 अन्वये मोहननगर परिसरात मोहननगर प्रवेशव्दार ते मेहता हॉस्पीटल डी.पी.रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेकामी मे.इंगवले पाटील कन्स्ट्रक्शन कं. नि.र.रू.14,85,84,480/- (अक्षरी र.रु.चौदा कोटी पंच्याऐंशी लाख चौ-याऐंशी हजार चारशे ऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.14,62,17,739/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.14,62,17,739/- पेक्षा 13.10% कमी म्हणजेच र.रु.12,70,63,215/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.22,07,731/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,59,010/- = एकुण र.रु.12,94,29,956/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ४८९५ विषय क्रमांक – २७
दिनांक – १९/०६/२०१९
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरातील यशवंतराव चव्हाण स्मारक समितीस महाराष्ट्र शासनाने पत्र क्र.पीसीसी-३०१९/प्र.क्र.१५/नवि-२२ दि.१६/०२/२०१९ अन्वये र.रू.५ कोटी देणगी स्वरूपात अदा करणेस मान्यता दिली आहे. सदर रक्कम अदा करणेसाठी खालील प्रमाणे तरतूद करणो आवश्यक आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्ष/ अनुदान | पान क्र. | अ. क्र. | सन २०१९-२० ची तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट कारवयाची तरतूद | एकूण आवश्यक सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३० लाख व्यतिरिक्त शासन मान्यतेने द्यावयाची अनुदाने | १२६ | ९ब | ११,५०,०००/- | १,८९,००,०००/- | -- | २,००,५०,०००/- |
| २ | भूसंपादन निधी (नगररचना) | २७४ | ३ | १४०,००,००,०००/- | -- | १,८९,००,०००/- | १३८,११,००,०००/- |
| | एकूण | | | | १,८९,००,०००/- | १,८९,००,०००/- | |

तरी वरील प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा,महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मामहापालिका सभेकडे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची प्रकरण २ नियम १(के) अन्वये पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८९६ विषय क्रमांक – २८
दिनांक – १९/०६/२०१९ विभाग- आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आमुका/९/कावि/१८९/२०१९ दि.१८/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील रस्ते यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाज करण्याकरिता निविदा नोटीस क्र.२/२०१५-१६ अन्वये निविदा प्रक्रियेद्वारे मे.डी.एम.एंटरप्रायझेस व मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. या २ संस्थांना दि.१/१२/२०१५ ते दि.३०/११/२०१७ या २ वर्षे कालावधीकरिता कामकाज सोपविण्यात आलेले होते. सदर कालावधी संपुष्टात आल्यानंतर उक्त संस्थांना मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२३५७ दि.२८/०२/२०१८, ठराव क्र.२७२२ दि.३०/०५/२०१८ व ठराव क्र.३४१६ दि.२३/१०/२०१८ अन्वये मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदरची मुदतवाढ दि.३१/१२/२०१८ अन्वये संपुष्टात आल्यामुळे ठराव क्र.४०९८

दि.२२/०१/२०१९ अन्वये ४ महिने कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली होती. तदनंतर नविन निविदा कामकाज सुरु करण्यास काही कालावधी लागणार असल्यामुळे मा.आयुक्त यांचेकडील दि.२/०४/२०१९ रोजीचे मान्य प्रस्तावान्वये दि.१/०५/२०१९ ते दि.३१/०७/२०१९ अखेर ३ महिने कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तथापि, आदेश क्र.आमुका/९/कावि/१६३/२०१९ दि.२१/०५/२०१९ अन्वये सदरचे कामकाज दि.१/०६/२०१९ पासून बंद करण्यात आले आहे. तथापि, मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांचेमार्फत शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळ्या जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजाकरिता निविदा प्रक्रिया राबविणेकामी दि.१७/०६/२०१९ रोजी मा.आयुक्त सो. व मा.सभापती, स्थायी समिती यांचेसमक्ष सादरीकरण करण्यात आले. सदर सादरीकरणामध्ये शहरातील एकूण १२९२ किमी.रस्त्यांचा समावेश असून ६ मी.पेक्षा कमी, ६ ते ९ मी. रुंदीचे, ९ ते १२ मी.रुंदीचे, १२ ते १८ मी. रुंदीचे, १८ ते २४ मी.रुंदीचे व महामार्ग तसेच बीआरटी रस्ते अशा स्वरुपात वर्गीकरण निविदेमध्ये करण्यात आले असून त्यानुसार साफसफाई करावयाच्या रस्त्याची लांबी २७४८ किमी निश्चित करण्यात आलेली आहे. सदर रस्त्याचे घनतेनुसार साफसफाईचे कामकाज करण्याकरिता तरतूद करण्यात आलेली असलेबाबत मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांचेमार्फत नमूद करण्यात आले आहे. सदर निविदा कालावधी हा ८ वर्षांचा असून त्याकरिता प्रतिवर्षी अंदाजे रु. ९७ कोटींचा वार्षिक खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार निविदा दस्तऐवज तयार करण्यात येत असून त्यास मा.स्थायी समिती सभेच्या मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या रोड स्वीपर मशिनचा तपशिल खालील प्रमाणे –

| PCMC Mechanised Street Sweeping – Package Wise Sweeping Length (In km) & Mechanised Sweeper Required | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Package Details | Heavy Mechanised Sweeper (4-5.6M) (in KM) | Medium Mechanised Sweeper (2-3.5M) (in KM) | Small Mechanised Sweeper (1-2.5M) (in KM) | Total | Mechanised Sweeper required (In Nos.) | | | Total Vehicle Required (In Nos.) |
| | | | | | Heavy Vehicle | Medium Vehicle | Small Vehicle | |
| Package – 1 (A & F) | 0.00 | 106.51 | 120.15 | 226.67 | 0 | 2 | 2 | 4 |
| Package – 2 (B & D ) | 0.00 | 112.14 | 109.46 | 221.60 | 0 | 2 | 2 | 4 |
| Package – 3 (C & E ) | 0.00 | 100.65 | 140.39 | 241.04 | 0 | 2 | 2 | 4 |
| Package – 4 (G & h ) | 0.00 | 103.43 | 100.08 | 203.50 | 0 | 2 | 2 | 4 |
| Package – 5 (Below NH4 ) | 128.78 | 84.68 | 44.11 | 257.57 | 2 | 1 | 1 | 4 |
| Package – 6 (Above NH4 ) | 137.56 | 96.84 | 39.31 | 273.07 | 2 | 1 | 1 | 4 |
| Total | 266.34 | 604.24 | 553.50 | 1423.45 | 4 | 10 | 10 | 24 |

वरील वाहनांव्यतिरिक्त छोट्या स्वरुपातील रस्त्यांवर साफसफाई करण्याकरिता रोड स्वीपर वाहनांसमवेत एकूण ५६ लिटर पिकर्सची आवश्यकता आहे. सदर लिटर पिकर्स हे सीएसआर अंतर्गत उपलब्ध करण्याबाबत चाचपणी करणेबाबत अथवा सीएसआर अंतर्गत सदर लिटर पिकर्स उपलब्ध न झाल्यास महानगरपालिकेमार्फत ते खरेदी करणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी सूचना दिलेल्या आहेत. सबब, मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांचेमार्फत शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळ्या जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजाकरिता तयार करण्यात आलेल्या आरएफपी नुसार ८ वर्षे कालावधीकरिता निविदा प्रक्रिया राबविणेकामी मा.महापालिका सभेकडे प्रशासकीय मान्यतेस व त्याकामी होणा-या वार्षिक र.रु.९७ कोटीचे खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची प्रकरण २ नियम १(के) अन्वये मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८९७ विषय क्रमांक – २९

दिनांक – १९/०६/२०१९

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – १) मा.स्थायी समिती ठराव क्र.४८६४ दि. १२/०६/२०१९

२) मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

दीपस्तंभ बहुउद्देशीय संस्था ही दिव्यांग, अनाथ, आदिवासी व ग्रामीण क्षेत्रातील, युवक-युवतींसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण व अन्य विविध प्रशिक्षणाचे प्रकल्प व उपक्रम राबविले जातात. अंध, अस्थिव्यंग, मुकबधिर विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजांप्रमाणे मार्गदर्शक, कौन्सिलर, तज्ञ व्यक्ति उपलब्ध करुन दिल्या जातात. तसेच अभ्यासासाठी संगणक, लॅपटॉप, एंजेल प्लेयर इ. तंत्रज्ञान शिकवून त्यांना उपलब्ध केले जातात. व्यक्तिमत्व विकास, मोबिलीटी, लाईफ स्किल्स शिकविण्यासाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन केले जाते. तसेच दिव्यांगांसाठी सुरु केलेला मनोबल प्रकल्प हा निवासी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी देशातील एकमेव प्रकल्प असून या अंतर्गत अंध, अस्थिव्यंग, कर्णबधिर व १६ वर्षावरील विद्यार्थ्यांना उच्च पदासाठीच्या स्पर्धा परीक्षांचे (UPSC, MPSC, SSC, Bank, Railway etc) प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतून व भारतातील पाच राज्यांमधून १७२ विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. त्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान व प्रशिक्षित मनुष्यबळ संस्थेने विकसित केलेले आहे. मागील वर्षी अल्पना दुबे ही विद्यार्थिंनी संपुर्ण अंध असुनही यु.पी.एस.सी परीक्षा पास होऊन प्रशिक्षण संपवून Asst. Commissioner of Income Tax या पदावर रुजू झाली आहे. रिना बारेला ही आदिवासी विद्यार्थीनी असुन तीला एक हात व एक पाय आहे. ही विद्यार्थिंनी मंत्रालयाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन मंत्रालयात उद्योग विभागात कार्यरत आहे. संस्थेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारी प्रांजल पाटील ही विद्यार्थिंनी यु.पी.एस.सीतुन आय.ए.एस.झाली आहे व सध्या प्रशिक्षण घेत आहे. अपंग युवकांना सरकारी नोक-यांमध्ये ३% आरक्षण देण्यात आलेले आहे. परंतु विशेषत: अंध मुलांसाठी त्यासंदर्भात तयारी व

मार्गदर्शनाची व्यवस्था कुठेही करण्यात आलेली नाही. तसेच अस्थिव्यंग विद्यार्थ्यांनाही त्याबाबत मार्गदर्शना अभावी प्रयत्न करता येत नाही. त्यामुळे अनेकवेळा त्यांच्या जागा रिक्त राहतात. अथवा अत्यंत कमी अपंगत्व असणा-या व्यक्तींनाच त्याचा लाभ होतो. शासनाचे अनाथ मुलांमुलींना शासकीय नोक-यांमध्ये १% जागा आरक्षित केल्या आहेत. परंतु या मुलांसाठी सुध्दा शिक्षण व प्रशिक्षणाच्या आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. याकरिता मनोबल या प्रकल्पामुळे या विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त होऊन त्यांचे जीवनमान उंचावू शकेल. त्यांना रोख रक्कमेच्या अथवा वस्तुंच्या मदतीपेक्षाही पायावर उभे राहता येईल व सन्मानाने , आत्मविश्वासाने जगता येईल असे शिक्षण व प्रशिक्षण या प्रकल्पाच्या माध्यमातुन देण्याचा प्रयत्न सुरु आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही औद्योगिक नगरी आहे. देशभरातुन नोकरी, व्यवसाय, शिक्षणाच्या निमित्ताने लाखो नागरिक या परिसरात येत असतात. महानगरपालिकेने सर्वांसाठी अनेक सुविधा दिल्या आहेत. सर्व घटकांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. दिव्यांग व्यक्तिंसाठीही महानगरपालिकेने पुढाकार घेतलेला आहे, परंतु १६ वर्षावरील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, उद्योजगता विकास, कौशल्य प्रशिक्षण, व्यक्तिमत्व विकास, यासाठी आवश्यक अशा सुविधा मात्र उपलब्ध नाहीत. यामुळे दिव्यांग व्यक्तींचा सर्वांगिण विकास करण्यासाठी येथे खूप वाव आहे. विशेषत: दिव्यांग विद्यार्थ्यांना योग्य सुविधा व प्रशिक्षणाच्या संधी मिळू शकतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात अनाथ, निराधार, युवक-युवतींची संख्या देखील अधिक असुन त्यांच्यासाठी सुध्दा उच्च शिक्षण व स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध नाही. दीपस्तंभ बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मनोबल हा दिव्यांग, अनाथ व निराधार घटकातील विद्यार्थ्यांसाठीचा प्रकल्प पिंपरी-चिंचवड मनपा परिसरात सुरु झाल्यास ख-या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकेल. या प्रकारचा प्रकल्प सुरु करणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही देशातील पहीली महानगरपालिका असेल. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि दीपस्तंभ बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विदयमाने दिव्यांग, अनाथ व निराधार घटकांसाठी महापालिकेने निश्चित केलेल्या अर्हतेनुसार “मनोबल” हा उपक्रम राबविण्यास सदर उपक्रम जुन २०१९ पासून सुरु करण्याकरिता **पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पिंपळे गुरव मनपा शाळेची (जुनी इमारत) इमारत या उपक्रमाकरिता आवश्यक सोयी सुविधांसह विनामोबदला तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करुन देण्यास** तसेच उपक्रम कायम स्वरुपी राहण्याकरिता भविष्यकाळात “सध्याचे पिंपरी न्यायालय अन्यत्र स्थलांतरीत झाल्यानंतर न्यायालयाची रिकामी होणारी इमारत आवश्यक त्या सोई सुविधांसह” ही इमारत या उपक्रमाकरिता विना मोबदला कायम स्वरुपी उपलब्ध करुन देण्यास आणि या उपक्रमांतर्गत दैनंदिन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याकरिता संस्थेच्या समन्वयाने इतर आवश्यक सोयी सुविधा वेळोवेळी मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेने देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे अनुसूची प्रकरण २ नियम १ (के) अंतर्गत पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८९८ विषय क्रमांक – ३०

दिनांक – १९/०६/२०१९

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.राहुल कलाटे

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.राहुल कलाटे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदावर श्री.ओमप्रकाश बहिवाल हे मानधनावर कार्यरत असून त्यांचा नेमणूक कालावधी दि.२३/०६/२०१९ रोजी संपुष्ठात येत आहे. पुढील ६ महिन्यांचा कालखंड हा पावसाळा तसेच गणेशोत्सव, दिपावली सणावारांचा असून आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्वाचा कालावधी आहे ही बाब विचारात घेता श्री.ओमप्रकाश बहिवाल यांना सध्याची मानधनावरील सेवा खंडीत करून दि.२५/०६/२०१९ पासून ६ महिने कालावधीसाठी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदावर दरमहा र.रू.४०,०००/- (अक्षरी र.रू.चाळीस हजार फक्त) मानधनावर पुर्वीच्या अटीशर्तीवर नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४८९९ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – फ क्षेत्रीय, आरोग्य

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे कडील पत्र क्र.फक्षेका/आ/२/कावि/२५३/२०१९ दि.१२/०६/२०१९

मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी शिपारस केले प्रमाणे –

फ क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतुक करणेकामी (Primary & Secondary Waste Collection) मे.एस.टी.मोटर्स यांना २ वाहनांना दि.०१/०४/२०१९ ते दि.३०/०६/२०१९ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल या कालावधी करीता तसेच १ ट्रक वाहनाकरिता दि.२९/०३/२०१९ ते दि.३०/०६/२०१९ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल या कालावधी करीता प्रति मे.टन र.रु.९५६.५५ प्रमाणे प्रत्यक्ष खर्च अंदाजे रु.रु.२०,००,०००/- (अक्षरी र.रु.वीस लाख फक्त) होणार असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४९०० विषय क्रमांक – ३२

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – करआकारणी व करसंकलन

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.कर/मुख्य/०३/कावि/१९०/२०१९ दि.१८/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन 2019-2020 करिता कर व करेत्तर बाबींचे दर सवलतींसह लागू करणेत आलेले आहेत. तसेच सन 2019-2020 चा आर्थिक वर्षात लागू करण्यात येणा-या सवलत योजनांची, मिळकतकर वसुली जनजागृती मोहिमेची माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांना व्हावी या करिता शहरातील विविध रेडीओ स्टेशन वरून जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील साउथ एशिया एफ.एम लिमिटेड या कंपनी रेड एफ.एम (93.5 FM) रिलायन्स ब्रॉडकास्ट या कंपनी बिग एफ.एम (92.7 FM), रेडीओ सिटी (91.1 FM), रेडीओ मिरची (98.3 FM) हे खासगी रेडीओ चँनेल्स व आँल इंडिया रेडीओचे प्रसार भारती (पुणे विविध भारती 101 FM) हे शासकीय रेडीओ चँनेल या कंपन्यांना/ चँनेल्सना जाहिरात प्रसिद्ध करण्याचा हक्क प्राप्त आहेत. (Broadcasting Rights) प्रस्तुत प्रकरणी निविदा प्रक्रिया न राबवता रेडीओ कंपन्यांकडून प्रती सेकंदचे दर घेऊन त्या प्रमणे कामकाज करण्यात येणार आहे. रेडीओ चँनेल्स वरून जाहिरात प्रसिद्ध करण्याकरिता प्रत्येक कंपनीचे प्रती सेकंदप्रमाणे वेगवेगळे दर ठरलेले असतात. उपरोक्त रेडीओ चँनेल्स ऐकणा-यांची संख्या तुलनेने जास्त आहे. त्यामुळे उक्त नमूद 05 रेडीओ चँनेल्सवरून सवलत योजनांची माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यांचेकडून दरपत्रक उपलब्ध करून घेण्यात आलेले आहे. त्यानुसार-

१) प्रसार भारती (पुणे विविध भारती 101 FM) या शासकीय रेडीओ चँनेल वरून प्रतिदिन 20 सेकंदाचे 12 (6 पेड व 6 फ्री) स्पॉट याप्रमाणे दि.01 जून 2019 ते 30 जून 2019 या कालावधीकरिता एकूण र.रु.1,80,540/- (सर्व करांसह) इतका खर्च अपेक्षित आहे.

२) रेड एफ.एम (93.5 FM) या खासगी रेडीओ चँनेल वरून प्रतिदिन 20 सेकंदाचे 12 स्पॉट याप्रमाणे दि.01 जून 2019 ते 30 जून 2019 या कालावधीकरिता एकूण र.रु.3,39,840/- (सर्व करांसह) इतका खर्च अपेक्षित आहे.

३) बिग एफ.एम (92.7 FM) हे खासगी रेडीओ चँनेल वरून प्रतिदिन 20 सेकंदाचे 12 स्पॉट याप्रमाणे दि.01 जून 2019 ते 30 जून 2019 या कालावधीकरिता एकूण र.रु.1,86,912/- (सर्व करांसह) इतका खर्च अपेक्षित आहे.

४) रेडीओ सिटी (91.1 FM) हे खासगी रेडीओ चँनेल वरून प्रतिदिन 20 सेकंदाचे 12 स्पॉट याप्रमाणे दि.01 जून 2019 ते 30 जून 2019 या कालावधीकरिता एकूण र.रु.3,82,320/- (सर्व करांसह) इतका खर्च अपेक्षित आहे.

५) रेडीओ मिरची (98.3 FM ) हे खाजगी रेडीओ चँनेल वरून प्रतिदिन 20 सेकंदाचे 12 स्पॉट याप्रमाणे दि.01 जून 2019 ते 30 जून 2019 या कालावधीकरिता एकूण र.रु.3,82,320/- (सर्व करांसह) इतका खर्च अपेक्षित आहे.

उक्त नमूद केलेप्रमाणे 05 रेडीओ स्टेशनवरून जाहिरात प्रसिद्ध करणेकामी अंदाजीत खर्च र.रु.14,71,932/- (अक्षरी र.रू.चौदा लाख एक्काहत्तर हजार नऊशे बत्तीस फक्त) हा मिळकतकर वसुली खर्च या लेखाशीर्षाचे तरतुदीमधून करण्यात येईल. सदरील खर्च निविदा न मागविता करारनामा न करता थेट पद्धतीने करण्यात येणार आहे. तरी उक्त नमूद केल्या प्रमाणे अंदाजित

र.रु.14,71,932/- किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४९०१ विषय क्रमांक – ३३

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – करआकारणी व करसंकलन

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.कर/मुख्य/०९/कावि/२९८/१९ दि.१८/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरुन राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये दिवाणी/फौजदारी आणि तत्सम प्रलंबित तडजोड योग्य प्रकरणे, तसेच घरपट्टी, पाणीपट्टी संबंधातील प्रकरणी मा.न्यायालयामार्फत निवाडा करण्यात येतो. दिनांक 13/07/2019 रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. याकामी दिनांक 17/06/2019 रोजी दुपारी 2.00 वाजता मा.आयुक्तसो यांचे दालनात मा.श्री.सी.पी.भागवत सो, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व मा.श्रीम.एस.बी.देसाई, दिवाणी न्यायाधीश व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पिं.चिं.मनपा आकुर्डी यांचे समवेत आयोजित बैठकीमध्ये दिनांक 13/07/2019 रोजी होणा-या राष्ट्रीय लोकअदालतमध्ये मिळकत कर वसूलीचे प्रकरणी मनपा शास्ती करामध्ये 90% सवलत देणेबाबत चर्चा झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 51 अन्वये शास्ती/दंड फी किंवा वसूलीचा खर्च आयुक्तास, आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार, नियम 41 खालील शास्ती, किंवा नियम 50 खालील फी किंवा वसूलीचा खर्च पूर्णत: किंवा अंशत: माफ करता येईल, अशी तरतूद आहे. सबब दिनांक 13/07/2019 रोजी होणा-या राष्ट्रीय लोकअदालतमध्ये मिळकत कर वसूलीची दाखलपूर्व प्रकरणी मनपा शास्ती/दंड करामध्ये खालील प्रमाणे सवलत देणेत यावी.

| अ. क्र. | थकबाकीसह संपूर्ण मिळकतकराची एक रक्कमी भरणेकामी कालावधी | मनपा कर शास्तीमध्ये देणेची माफी/ सवलत टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | दिनांक 13/07/2019 रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे दिवशी | भरणा दिनांकापर्यंत आकारणेत आलेल्या मनपाकर शास्ती/दंड रक्कमेचे 90% |

उक्त नमूद प्रमाणे राष्ट्रीय लोकअदालतीचे दिवशी थकीत रक्कम एकरकमी वसूल होण्याचे दृष्टीने मनपा शास्ती/दंड करामध्ये सवलत देणेस व सध्याचे मिळकतकर संगणक प्रणालीमध्ये आवश्यक बदल करणेस मान्यता देणेस तसेच पाणीबील थकबाकी वसुलीस चालना मिळणेसाठी "जे ग्राहक दिनांक १३/०७/२०१९ पर्यंत पाणी बीलाचे संपुर्ण थकबाकी भरतील त्या ग्राहकांना दि.१३/०७/२०१९ रोजीच्या मा.लोकअदालतीच्या माध्यमातून थकबाकीच्या रकमेवर १०% सवलत

देणेस व थकबाकी वरील १०% रक्कम ही दंडाच्या रकमेपेक्षा जास्त असल्यास केवळ दंडाची रक्कम माफ करणेस तसेच लोकअदालतीच्या माध्यमातून थकबाकीची रक्कम ४ समान हप्त्यामध्ये भरणेस जे थकबाकीदार तयारी दर्शवितील त्यांना थकबाकी वरील रकमेवर ५% सवलत देण्यास व . थकबाकी वरील ५% रक्कम ही दंडाच्या रकमेपेक्षा जास्त असल्यास केवळ दंडाची रक्कम माफ करणेस आणि." वरील प्रमाणे करसंकलन पाणीपुरवठा विभागा प्रमाणेच स्थानिक संस्था कर (LBT), आकाश चिन्ह व परवाना इ. विभागांकडील देखील अशी थकीत प्रकरणे असल्यास मा.लोकअदालतच्या माध्यमातून त्यांना व्याजाच्या रकमेमध्ये १०% पर्यंत सुट देण्याचे निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८ यांना प्रदान करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची प्रकरण २ नियम १(के) अन्वये मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४९०२ विषय क्रमांक – ३४

दिनांक – १९/०६/२०१९

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.नम्रता लोंढे, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाकडील १) पंडीत जवाहरलाल नेहरु प्राथमिक शाळा च-होली २) वडमुखवाडी प्राथ.शाळा वडमुखवाडी आणि ३) बबनराव भोंडवे प्राथ.शाळा रावेत व ४) पुनावळे प्राथ.५) सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळा, मोशी मुले क्र.१०६ व मुली शाळा क्र.१०७ या शाळेतील ६०५ विद्यार्थी या शाळेमध्ये परिसरातील २ ते ३ कि.मी. अंतरातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच या शाळेतील विद्यार्थी गोर-गरीब, मोल-मजूरी करणा-या कामगार वर्गातील असल्याने या विद्यार्थ्यांची आर्थीक परिस्थिती बिकट आहे. त्यांना मनपा शिक्षण विभागातर्फे बस सुविधा उपलब्ध करुन दिल्यास त्यांची शैक्षणिक गुणवत्ता व शाळेची पटसंख्या देखील वाढ होणार असल्याने सदर शाळेतील विद्यार्थ्यांकरीता सन २०१८-१९ चे वाहतुक सुविधा पुरविणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र.४०३३ विषय क्र.३९ दि.०४/०१/२०१९ अन्वये प्रति दिन प्रति विद्यार्थी ११.५० पैसे प्रमाणे फक्त तिन महिने करीता मंजूरी देण्यात आली होती. परंतु चालू शैक्षणिक वर्षाकरीता १७ जुन २०१९ पासून शाळा सुरु होत आहेत. शाळेचे मुख्याध्यापक तसेच सन्मा.नगरसेवक यांचेमार्फत कोणीही विद्यार्थी प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहू नये याकरीता विद्यार्थ्यांना बस सुविधा उपलब्ध करुन देणेकामी वारंवार मागणी होत आहे. तसेच मे.प्रेम टुर्स ॲन्ड ट्रॅव्हेल हे मागील अनेक वर्षापासून ११.५० इतक्या कमी दरानेच वाहतुक सुविधा उपलब्ध करुन देत आहेत. परंतु सद्यस्थितीत पेट्रोल व डिझेलचे दर वाढल्याने ठरावाप्रमाणे मागील मंजूर दर ११.५० परवडत नसल्याने प्रति विद्यार्थी प्रति दिवस र.रु.१५/- इतक्या दराने वाहतुक सुविधा उपलब्ध करुन देण्याची पत्रान्वये मागणी केली आहे. सदर शाळातील विद्यार्थ्यांना

तातडीने वाहतुक बस सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक असून प्रति विद्यार्थी प्रति दिवस र.रु.१५/- रुपये या प्रमाणे एकूण ६०५ विद्यार्थी करीता “मे.प्रेम टुर्स ऍन्ड ट्रॅव्हल्स ”या वाहतुक एजन्सी कडून एकुण येणा-या बिला व्यतिरिक्त वाहतुक बस मध्ये महिला वाहतुक मदतनीस र.रु.७,०००/- प्रति महिना नियुक्त करुन पुढील सन २०१९-२० व २०२०-२१ पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची प्रकरण ५(२)(२) नुसार थेट पध्दतीने ३ महिने कालावधीसाठी काम करुन घेणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.७,५०,०००/-(अक्षरी र.रु.सात लाख पन्नास हजार फक्त) खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४९०३ विषय क्रमांक – ३५
दिनांक – १९/०६/२०१९ विभाग - उद्यान
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.उद्यान/४/कावि/१६४/२०१९ दि.३०/०५/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

म.न.पा वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.१६/२०१८-१९ मधील मनपाचे वृक्षसंवर्धन विभागासाठी वृक्षारोपणाची मोठी रोपे पुरविणेकामी मे.सदिच्छा कंस्ट्रक्शन कंपनी यांची निविदा र.रू.३९,००,०००/-(अक्षरी र.रू.एकोणचाळीस लाख फक्त)या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% ने कमी दराची निविदा स्विकृत करणेत आलीअसून त्याप्रमाणे येणारा खर्च र.रू.३८,२२,०००/-चे खर्चास मान्यता देणेत येत आहे व त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४९०४ विषय क्रमांक – ३६
दिनांक – १९/०६/२०१९ विभाग - उद्यान
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.उद्यान/४/कावि/१६७/२०१९ दि.३०/०५/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

म.न.पा वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.१८/२०१८-१९ मधील मनपाचे वृक्षसंवर्धन विभागासाठी मिलीटरी हद्दीतील स्टेशन हेडक्वार्टर देहुरोड येथील तळवडे रूपीनगर येथे मोठी रोपे पुरविणे व लागवड करून २ वर्षे देखभाल करणेकामी मे.बी.व्हि.जी.इंडीया लि. यांची निविदा र.रू.२,१३,१६,७००/-( अक्षरी र.रू.दोन कोटी तेरा लाख सोळा हजार सातशे फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजत्रकीय दरापेक्षा १.००% ने कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली

असून त्याप्रमाणे येणारा खर्च र.रू.२,११,०३,५३३/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे व त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४९०५ विषय क्रमांक – ३७

दिनांक – १९/०६/२०१९

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.झामाबाई बारणे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने इंडिअन बॉडी बिल्डींग एन्ड फिटनेस फेडरेशन, महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन यांचे मान्यतेने व पिंपरी चिंचवड अमेच्युअर बॉडी बिल्डींग असोसिएशन यांचे सहकार्याने दि.२८ ते २९ जून, २०१९ या काळात प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे महापौर चषक ५९ वी राष्ट्रीय बॉडी बिल्डींग (वरिष्ठ) स्पर्धा २०१९-२० आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे येणा-या अंदाजे एकूण र.रू.३२.९०,२००/- (अक्षरी र.रू.बत्तीस लाख नव्वद हजार दोनशे फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे व स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस व वेळ अपुरा असल्याने स्पर्धा अनुषंगाने मेडल्स, ट्रॉफिज, मानचिन्हे, फ्लेक्स, बॅनर, निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्र इ. कोटेशन नोटीस प्रसिध्द करून खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ४९०६ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १९/०६/२०१९ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पअक/३/कावि/१९९/२०१९ दि.१८/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील निविदा क्रमांक ENV/4/5/2018-19 अन्वये पिंपरी चिंचवड शहरात पर्यावरण विषयक जागृतीसाठी बोर्ड बसविणे, वॉल पेंटींग करणे व इतर आवश्यक कामे करणेकामी मे.ओम एंटरप्रायझेस यांचेकडून निविदा र.रु.४१,६७,९४६/- मध्ये वाढीव कामानुसार होणारी र.रु.२०,८३,९३५/- इतक्या रक्कमेची वाढ लक्षात घेता होणा-या सुधारित र.रु.६२,५१,८८१/- चे सुधारित खर्चास -०५.००% कमी दराने काम करुन घेणेस व नियमानूसार निविदेतील अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर वेगळा अदा करणेस या अटीस अधिन राहून

उपरोक्त कामाच्या व्याप्तीमध्ये वाढ करून उपरोक्त मागणीनुसार सदरची वाढीव कामे चालू कामातून निविदा रकमेच्या ५०% वाढीच्या मर्यादेत निविदा मान्य दराने करून घेणेस व त्यानुसार होणारे र.रू.२०,८३,९३५/- चे वाढीव खर्चासह होणा-या र.रू.६२,५१,८८१/- चे सुधारित खर्चास मान्यता देणेत येतआहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(मडिगेरी विलास हनुमंतराव)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/६४१/२०१९
दिनांक – १९/०६/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.